JETIR.ORG ISSN: 2349-5162 | ESTD Year : 2014 | Monthly Issue
JOURNAL OF EMERGING TECHNOLOGIES AND INNOVATIVE RESEARCH (JETIR)
An International Scholarly Open Access, Peer-reviewed, Refereed Journal

# स्वातंत्र्यसेनानी डॉ. शिवाजीराव पटवर्धन

प्रा.डॉ.आर.पी.झनके
सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभागप्रमुख
स्व.बी.एस.कला.प्रा.एन.जी.विज्ञान व ए.जी.वाणिज्य

<u>प्रस्तावना</u> :— 20 व्या शतकाच्या पूर्वार्धात देशाच्या स्वातंत्र्यासाठी राष्ट्रीय पातळीवर विविध चळवळींच्या उदय होत असतांनाच त्याचे पडसाद सर्वत्र देशांत खेडयापाडयात न पडणे अशक्य होते कारण ग्रामपातळीवर सुध्दा स्वातंत्र्यासाठी जीवन वाहणारे कार्यकर्ते सक्षम होते. त्यानुसार सदर शोधनिबंधात स्वातंत्र्य चळवळीत विदर्भाचे योगदान या शिर्षकाचा एक अंश म्हणून डॉ. शिवाजीराव पटवर्धन या महान देशभक्ताचा जन्मापासून ते देशस्वातंत्र्या पर्यंत महीतीची दखल घेण्याचा प्रयत्न केला आहे. यामध्ये डॉ. शिवाजीराव पटवर्धन उर्फ दाजीसाहेब यांच्या जीवनपटावरून अमरावतीतच नव्हे तर अख्या विदर्भाच्या सामाजिक व राजकिय जीवनाची ओळख होते. मोठमोठया चळवळी व त्यांच्याशी कमी—अधिक संबंध असलेल्या मान्यवर व्यक्तींच्या भावी पीढीला वैशिष्टयपूर्ण माहिती मिळते. महाराष्ट्रातील व दिर्भातील समाजसेवक व देशभक्त अमरावतीच्या परिसरातील सामाजीक व राजकीय जीवनात परिवर्तनासाठी कसे कार्यरत होत हे समजवणे आवश्यक आहे. दारिद्रय, जातीयता, रोगराई निर्मुलना बरोबरच त्यांचा स्वातंत्र्यप्राप्तीचा ध्यास महत्वाचा होता.

डॉ. पटवर्धनाच्या या अल्पशा जीवनपटामध्ये त्यांच्या जन्मापासून म्हणजे जामखिंडीपासून ते तपोवनाची स्थापना पर्यंतच्या जीवनप्रवाहचे वर्णन आहे. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सत्तेमागे न धावता डॉ. शिवाजीरावांनी कुष्ठरोग निर्मुलन कार्याकडे वळणे हे विशेष लक्ष केंद्रीत करण्यासारखे आहे. डॉ. शिवाजीराव पटवर्धन महान तत्वज्ञ होते. त्यांची महानता,व्यापकता व विचारांचा डोळसपणा यासोबतच त्यांचा ध्येयवाद स्पष्ट वक्तेपणा, निर्भीडपणा, त्यांच्यावरील प्रभावी विचारांचा पगडा अशा ब—याच बाबी दिसून येतात. याशिवाय स्वातंत्र्य संग्रामाच्या काळात म. गांधीजींनी सत्याग्रह व चळवळीच्या प्रचार—प्रसारासाठी महाराष्ट्र दौरा करून त्यांच्या प्रती विदर्भवासीयांची आपुलकी म्हणून आचार्य विनोबा भावे व जमनालाल बजाज यांचाही अतिसंक्षिप्त आढावा घेतला आहे.

<u>स्वातंत्र्यासाठी राजकारणात प्रवेश</u> :— डॉ. शिवाजीरावांनी 1920 पूर्वीच समाजसेवेसाठी एक मंडळ स्थापन केले. 1921 मध्ये अमरावतीत नगरकॉंग्रेसची स्थापना करण्यासाठी कॉंग्रसपक्षाने शिवजीरावांकडे जबाबदारी दिली. 19 मार्च 1921 रोजी वकिलांच्या क्लबहारूसमध्ये झालेल्या सभेत महात्मा गांधी व कस्तुरबा गांधी उपस्थित होते. यावेळी गांधींजीच्या हिंदी भाषणाच्या मराठीतून अनुवाद पार्वताबाई पटवर्धन यांनी केला होता. म्हणजेच राजकारणात व स्वातंत्र्यलढयात पार्वतीबाईही सहभागी होत्या. म. गांधीचा परदेशी वस्तुंचा बहिष्कार व स्वदेशीचा स्विकार या तत्वांच्या प्रसारासाठी डॉ. शिवाजीरावांच्या अध्यक्षतेखाली 7 जुलै 1921 ला अमरावतीला गणेश

नाटकगृहात पहिली सभा झाली. त्यांनतर 20आक्टो 1921 रोजी हनुमान व्यायामशाळे तर्फे शारीरिक संपत्तीची जापासना या विषयावर व्याख्यानमाला आयोजित केली. त्यात शिवाजीराव होते. 9 डिसं. रोजी पकडण्यात आलेल्या पुढारी यांच्या अभिनंदनपर सभेत अध्यक्षस्थानी डॉ. शिवाजीराव होते ही सभा गांधीचौकात पार पडली. 18 जाने. 1922 ला अमरावतीमध्ये दारूच्या गुत्यावर पिकेटींग करण्यासाठी त्यांची सहभाग नोंदविला. 3 सप्टें. 1923 रोजी इंद्रभुवन थिएटरमध्ये पटवर्धनाच्या अध्यक्षतेखाली हिंदू महासभेच्या स्थापनेसाठी पहिली सभा झाली. त्यावेळी एक पोटकमेटी स्थापना करून अमरावती शहरातील देवळे, मशिदी, चर्च यामधुन हिंदू–मुस्लीम ऐक्यासाठी प्रार्थना करण्यात आल्या. याचवेळी गांधींच्या 21 दिवसांचा उपवास सुटला त्याबददल हिंदू–मुसलमान ऐक्यसभा म्हणून हया सभा देशभर आयोजित केल्या. त्यामध्ये शिवाजीरावांचे व्याख्यान झाले.अमरावती शहरातील गणेशमंडळातही शिवाजीरावांनी भाषणे करून स्वातंत्र्य चळवळीत गती दिली.

<u>देशासाठी समाजकारण</u> :– 23 जुन 1926 रोजी शिवराज्यारोहणोत्सव व प्रतापजयंती अमरावतीत साजरो करण्यात आली. या सभेचे आभारप्रदर्शन शिवाजोरावांनी केले. दरवर्षी होणाऱ्या टिळक सप्ताहात त्यांची व्याख्याने होत. डॉ. पटवर्धनांवर लोकांचे फार प्रेम होते. 16 ऑगष्ट 1926 च्या नगरपालिकेच्या पोटनिवडणूकीत डॉ. पटवर्धन विजयी झाले. त्यावेळी हनुमान व्यायामशाळेचा राजकारणापासून संबंध तोडून फक्त व्यायाम प्रसार करणारी संस्था म्हणून नावरूपाला आणली. या व्यायामशाळेच्या नवीन इमारतीच्या उदघाटनासाठी शिवाजीरावांचे निमंत्रण स्विकारून म. गांधी 21 डिसें. 1926 रोजी दोन तासासाठी अमरवतीस आले होते. यावेळी गांधीजींचे पहिलेच भाषण ऐकवण्याचा योग पटवर्धनांनी अमरावतीकरांना व आसपासच्या जनतेस आणून दिला.त्यावेळी गांधींनी पटवर्धनांचे व व्यायामशाळेचे कौतुक केले. 1 मे1927 ला अमरावतीत त्रिशतसांवत्सरिक शिवजयंती उत्सव साजरा करण्यात आला. त्यावेळी शिवचरित्रावर अभ्यासपूर्ण व आवेशयुक्त भाषण पटवर्धनांनी केले. डॉ. शिवाजीराव पटवर्धन यांना अस्पृश्यांबददल फार कळवळा होता. अमरावतीचे अंबादेवीचे देउळ अस्पृश्यांसाठी खुले करण्याकरिता डॉ. भाउसाहेब पंजाबराव देशमुख व डॉ. पटवर्धन यांची भुमिका व पाठींबा विशेष महत्वाचा ठरला. डिसें. 1927 मध्ये आर्य समाजमंदिरात अस्पृश्यांसह भोजनाच्या कार्यक्रमातही डॉ.पटवर्धनावी सहभाग होता. त्यांनी हनुमान व्यायामशाळेचे चालकत्व स्विकारून शाळेची उत्कृष्ट प्रगती घडवली. नवनवे उपकम सुरू करून व्यायाम शाळेला संपूर्ण भारतात मामान्यता मिळवून दिली.त्यामुळे केवळ विदर्भातच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रात अभिनंदनास पात्र ठरून महाराष्ट्र 'शाररिक शिक्षण परिषदेचे अध्यक्षस्थान शिवाजीरावांनी देउन संपूर्ण महाराष्ट्राचे त्यांचा गौरव केला. विदर्भ युवक परिषेदेच्या कामातही सकिय राहून 20 आक्टों. 1928 रोजी या परिषदेचे पहिले अधिवेशन अमरावतीत भरले.

सत्याग्रहातून राष्ट्रीय कार्य :– इ.स.1929 मध्ये अमरावती जिल्हा कॉंग्रेस कमेटीत सदस्य म्हणून डॉ. शिवाजीरावांच्या समावेश झाला. या नव्या जिल्हा कॉंग्रेस कमेटीने 6 ते 13 एप्रिल दरम्यान राष्ट्रीय सप्ताह आयोजीत कला 9 फेब्रु. 1930 रोजी वऱ्हाड प्रांतीक कॉंग्रेस कमेटीच्या उपाध्यपदी डॉ.पटवर्धनांची निवड करण्यात आली. इंग्रजांच्या दडपशाही विरूध्द अमरावतीच्या आसपासच्या गावांमध्ये जाउन त्यांनी लोकजागृती केली. सत्याग्रहाच्या तयारीच्या दृष्टीने युध्दमंडाळाची स्थापना प्रांतिक कॉंग्रेस कमेटीने केली. 6 एप्रील जालीयनवालाबाग स्मृती दिनानिमित्त राष्ट्रीय सप्ताहाला सुरूवात झाली. त्यावेळी जिल्हयांच्या निरनिराळया भागातून दौरा काढून जागोजागी स्वयंसेवकांची नोंद करून अमरावतीच्या शिबीरास प्रशिक्षणासाठी बोलावले. कॉंग्रेस अध्यक्ष पं.

जवाहरलाल नेहरूंना अटक झाल्याबददल 15 एप्रिलला अमरावतीत बंद पाळण्यात आला. दुपारी 5 वाजता भव्यमिरवणूक काढून झालेल्या सेभेत आवेशपूर्ण भाषणातून अन्याय व दडपशाहीला वाचा फोडली.

स्वातंत्र्यचळवळीच्या काळात डॉ. पटवर्धन यांनी अजिबात कुचराई केली नाही. चरखा, टकळी, सूत कातने याबाबत प्रचारकार्यातून वरूडच्या शिबीरात सूत कातण्याचा प्रयत्न बराच यशस्वी झाला. सभा, व्याख्याने, स्वयंसेवक मिळवणे, खादी विक्री करणे व कॉंग्रेसचा संदेश लोकांपर्यंत पोहचविणे असा कामाचा सपाटा सुरू होता. 6 मे रोजी गांधींनी अटक झाल्यामुळे अमरावतीत डॉ. पटवर्धनांनी सरकारच्या निषेंध करण्यासाठी सभेचे आयोजन केले. त्यात स्वदेशी व बहिष्कार चे महत्व समाजावून सांगीतले, या कार्यामुळे त्यांचे सहकारी वामनराव जोशींना इंग्रजांनी बडनेरा रेल्वेस्थानकावर अटक केली. त्यांना अमरावतीच्या जेलमध्ये ठेवण्यात आले. यावेळी पटवर्धन व त्यांच्या सहकाऱ्यांनी संपूर्ण अमरावती शहरात हरताळ फासला. यावेळी रात्री झालेल्या सभेतही पटवर्धनांनी सरकारच्या दडपशाहीचा निषेध केला. त्यानंतर मोर्शी, वरूड, चांदूरबाजार, शिरसगांव, रामतिर्थ, नेरपिंगळाई, वाठोडा, या गावांमध्ये डॉ. पटवर्धन यांनी प्रचार दौरा केला. नंतर पुसद येथे बापूजी अणे यांना अटक केल्याने 11 जुलैला अमरावतीत हरताळ पाळण्यात आला. व प्रचंड मिरवणूक काढण्यात आली. यात सर्व स्तरातील स्त्री–पुरूष, हमाल, विदयार्थी सहभागी होवून सर्वांनी सरकारचा निषेध केला. पुढे 12 जुलैला डॉ. पटवर्धन डॉ. सोमण यांना 108 कलमाखाली अटक झाली. बातमी कळताच हजारो जनसमुदाय त्यांच्या दवाखान्यासमोर जमा झाला. शेवटी पटवर्धनांनी लोकांना शांत केले. त्यानंतर पार्वताबाई नाही 117 कलमाखाली अटक झाली. त्यामुळे लोक फारच चिडले. पोलिस अधिकाऱ्यांना बाहेर निघणे कठीण होते 8 मार्च रोजी डॉ. पटवर्धन सुटुन आले. त्यांचे सर्वत्र स्वागत झाले. 11 मार्च ला पार्वतीबाईही सुटल्या होत्या.

अखिल भारतीय महिला संघटन :– डॉ. पटवर्धन यांना अमरावती जिल्हयाच्या स्वातंत्र्य संग्रामात फार महत्वाचे स्थान होते. 21 मार्चला त्यांच्या निवासस्थानी वऱ्हाड प्रांतीक कॉंग्रेस कमेटीची सभा झाली. 23 मार्चला स्वातंत्र्यासाठी बलीदान करणाऱ्या भगतसिंग व राजगुरू दिन साजरा करण्यात आला. 25मार्चला सुखदेव, भगतसिंग, राजगुरू यांच्या फाशीची तिव्र प्रतिकिया अमरावतीत अमटून कडकडीत हरताळ पाळण्यात आली. 27 जून 1929 रोजी डॉ. पटवर्धन यांच्या निवासस्थानी सभा होवून अमरावती जिल्हा सेवादलची स्थापना करण्यात आली. 4 सप्टें. ला सायंकाळी ब्रम्हविदया मंदिरात सौ. पार्वतीबाई पटवर्धन यांच्या अध्यक्षतेखाली स्त्रियांची संभा होवून अखिल भारतीय महिला परिषेदेच्या प्रांतीक शाखेची स्थापना करण्यात आली. या शाखेच्या नव्या योजनेनुसार अस्पृशता निवारण मंडळ स्थापन करण्यात आले. 15 ऑक्टों. 1931 रोजी बंगालमधील शाळकरी मुलींना दिलेल्या वागणूकी विरोधात डॉ. पटवर्धन यांच्या अध्यक्षतेखाली गणेशनाटकगृहात सभा झाली. 17 नाव्हें. ला लाला लजपतराय यांच्या पुण्यतिथी निमीत्त चौकात सभा झाली त्याचेही अध्यक्ष डॉ. पटवर्धन होते.

15 जाने 1932 रोजी सकाळी 5 वाजता पोलीस इन्स्पेक्टर काही पोलीसांना घेउन डॉ. पटवर्धनाच्या घरी गेले. त्यवेळी झोपेतून उठून, स्नान, पूजा आटोपून ते पोलीसांच्या स्वाधीन झाले. त्यांना अमरावती जेलमध्ये नेण्यात आले. बातमी कळताच प्रचंड जनसमुदास त्यांच्या घरापुढे जमला गावात हरताळ पाळण्यात आला. विदयार्थींनी शाळा सोडून मिरवणूक काढल्या पटवर्धनांना 3 वर्षे सक्तमजूरी व 350 रू दंड अशी जबर शिक्षा ठोठावली खटला भरण्याच्या वेळी पार्वतीबाईनी उत्तेजक भाषण केल्याने त्यांनाही तिथेच अटक केली. त्यामुळे तर पूर्ण शहरच खवळले रात्री 8 वाजता नेहरू मैदानावर वीर वामनराव जोशी यांच्या अध्यक्षतेखाली प्रचंड जाहीर सभा झाली 16 मार्चला डॉ. पटवर्धन यांची सजा कमी करण्यासाठी अमरावती बार असोसिएनची सभा होवून ठराव

संमत केला. तुरूंगातून सुटल्यानंतर सभा घेणे, मोर्चे काढणे , व्याख्याने देणे, लोकजागृती करणे,अटकेचा निषेंद करणे सुरूच राहीले. वैयक्तीक सत्याग्रहात त्यांनी सक्रिय सहभाग घेउन प्रभावी कार्य केल्याबददल त्यांना पुन्हा अटक करण्यात आली. तुरूंगातुन सुटका झाल्यानंतर 1941 च्या यआंदोलनात भाग घेतल्यने पुन्हा अटक करण्यात आली. पुढे 1942 च्या मुंबई कॉंग्रेसच्या अधिवेशनावरून परत येत असतांना प्रवासातच मलकापूर येथे पठवर्धनांना अटक करण्यात आली.इ.स.1942 ते 1945 पर्यंत शिवनी व नंतर जबलपूर तुरूंगात ठवण्यात आले. त्यावेळी त्यांच्यासोबत सुभाष चंद्रबोस ही होते. तुरूंगातून सुटुन आल्यावर त्यांनी आपले जीवन कुष्ठसेवेसाठी खर्च करण्याचा निर्णय घेतला.

## सारांशः—

देशाच्या स्वातंत्र्यासाठी महात्मा गांधी देशपातळीवर कार्यरत असतांना त्यांच्या कार्याचे पडसाद ग्रामीण परिसरात पडणे उपरिहार्य होते. कारण महाराष्ट्रातील स्वातंत्र्य चळवळीला वेग आला होता.न्या.रानडे, नामदार गोखले, विष्णुशास्त्री चिपळूणकर, लो.टिळक, श्री. केळकर, सावरकर बंधु, आचार्य विनोबा भावे, आप्पा पटवर्धन, देव—दास्ताने, डॉ. शिवाजीराव पटवर्धन, जमनलाल बजाज या महाराष्ट्रोतील समाजसेवक,देशभक्तांनी 20 व्या शतकात महाराष्ट्र तथा विदीर्भात गांधींच्या सत्याग्रह व चळवळींना सहकार्य करून राष्ट्रवादी चळवळींना, कायाल चालना दिली. महात्मा गांधीनी 1927 मध्ये महाराष्ट्र दौरा केला त्यावेळी त्यांना अशा कार्यकर्त्यांची विपुलता दिसून आली. त्यांच्या प्रभावी कार्याची आपुलकी गांधीजीनाही होती.

स्वातंत्र्यचळवळीच्या माध्यमातून सक्रिय सहभाग दर्शवून म.गांधी., सुभाषचंद्रबोस, बाबा आमटे,विनोबा भावे, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या विचाराची पताका विदर्भात पसरविण्याचे कार्य आयुष्यभर डॉ. शिवाजीराव पटवर्धन यांनी केल. आत्यंतिक तत्वनिष्ठा, प्रखर राष्टनिष्ठा, दुःखी कष्टी लोकांबददल प्रेम व कळवळा, त्यांची जीवन समृध्द करण्याची तळमळ, स्वाभीमानी आत्मनिष्ठा या गुणांचा डॉ. शिवाजीराव पटवर्धन उर्फ दाजीसाहेब यांच्यात संयोग झाला. आयुष्याच्या शेवटी आपला सर्व डोलारा शासनाच्या ताब्यात देउन हा महान आत्मा अनंतात विलीन झाला.

## संदर्भ—ग्रंथ :—


1. तराळ सतीश — जीवनव्रती दाजीसाहेब — समीर प्रकाशन अमरावती (1988)
2. भांडारकर पु.ल. — सामाजीक संशोधन पध्दती — महा.राज्य ग्रंथ निर्मीती मंडळ पुणे.
3. शिखरे दा.न.— संपा. व अनुवादक —गांधी विचार दर्शन(महाराष्ट्र व.म.गांधी )
   गांधी— स्मारक— निधी (महाराष्ट्र शाखा ) अंतर्गत गांधी—वाड.मय—प्रकाशन समिती.

4- Dr.Shivajirao Patvardhan Wikipidia